प्रकरण दुसरे

# विश्वास पाटील वाङ्मयीन जडणघडण

(लेखनामागील प्रेरणा 'पानिपत' व 'रणांगण' विषय एकच परंतु

वाङ्मय प्रकार भिन्न यामागील भूमिका)

## ■ विश्वास पाटील यांचे चरित्र :–

श्री. विश्वास महिपती पाटील यांचा जन्म २८ नोव्हेंबर १९५९ रोजी नेर्ले (ता.शिराळा, जि.कोल्हापूर) या ठिकाणी शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण नेर्ले या गावीच झाले. इयत्ता आठवीला ते कोकरुड (ता.शिराळा) येथील 'महाराष्ट्र हायस्कूल' मध्ये शिकले. इयत्ता ९ वी ला ते पाचगणी (गुढे ता.शिराळा) येथे गेले. मात्र १० वीला ते कोकरुडला परत आले.

''पानिपत'' कार विश्वास पाटील या नामाभिदानानेच साहित्य क्षेत्रात सुपरिचित असणाऱ्या पाटील यांचे ११ वी व १२ वी चे शिक्षण 'न्यू कॉलेज', 'राजाराम कॉलेज', कोल्हापूर येथेच पार पडले. बी.ए. व एम.ए. चे शिक्षण त्यांनी शिवाजी विद्यापीठात घेतले. बी.ए. व एम.ए. त्यांनी इंग्रजी विषय घेऊन पूर्ण केले. कोल्हापुरातच त्यांनी कायद्याची पदवी घेतली.

पाटील यांचे सुरुवातीला एकत्र कुटुंब होते. मात्र नंतर ते विभक्त झाले. त्यांचे वडील स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांनी १९३० च्या बिळाशीच्या सत्याग्रहात व १९४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामात सक्रीय सहभाग घेऊन नावाला साजेल अशी कामगिरी बजावली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही त्यांनी हिरिरीने सहभाग घेतला होता. त्यामुळे त्यांच्या घरी राजकीय व्यक्तींचे येणेजाणे मोठ्या प्रमाणात होते.

व्यक्तींच्या जडणघडणीत लहाणपणचे संस्कार अत्यंत महत्त्वाचे असतात. भोवतालचे वातावरण सहवासातील व्यक्ती व परिसर यांचाही व्यक्तीच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा असतो. लेखक म्हणून नाव कमावण्याची त्यांची लहाणपणापासूनची इच्छा होती. ती १९७५ ला इयत्ता १०वीत असताना पूर्ण झाली. पुण्याच्या ''तरुणभारत'' वासंतिक अंकात ''स्त्रीधन'' विषयावरील ''कायदा'' ही त्यांची कथा प्रथम प्रकाशित झाली. या कथेला तृतीय क्रमांकाचे १०० रुपयाचे बक्षीस मिळाले आणि येथूनच त्यांचा नवकथाकार म्हणून प्रवास सुरु झाला. महाविद्यालयात असताना ''बिल्वदल'' अंकात ''भाकरीची कथा'', ''मराठा'' दिवाळी अंकात ''दिशा'' इत्यादी कथा प्रसिद्ध झाल्या. महाविद्यालयात असताना

त्यांनी एका आठ पानी ''कोल्हापूर सिने साप्ताहिका''चे संपादक म्हणून काम पाहिले. याशिवाय दै.''सकाळ'' च्या संपादकिय विभागात त्यांनी काम केले आहे.

महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच 'उत्कृष्ट अभिनेता' म्हणून त्यांनी अनेक स्पर्धातून पारितोषिके मिळविली. एक वर्ष त्यांनी एका नाटक कंपनीत अभिनेता म्हणून काम केले. बाबुराव गोखले यांच्या ''करायला गेलो एक'' या नाटकात प्रमुख भूमिका करीत असतानाच 'अभिनय' हाच व्यवसाय म्हणून स्विकारायचा असे त्यांनी ठरविले. पण १९८० ला बी.ए. झाल्यानंतर लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसले. आणि गुणवत्ता यादीत अग्रक्रमाने 'उपजिल्हाधिकारी' म्हणून त्यांची निवड झाली. ''करायला गेलो एक'' या नाटकाचे शिर्षक त्यांना त्यावेळी लागू पडले. त्यामुळे पाटील गंमतीने म्हणतात ''बनना था ॲक्टर, क्या करे बुरी किस्मत, बन चुके डेप्युटी कलेक्टर''[१] सध्या ठाणे येथे उपजिल्हाधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

स्पर्धा परीक्षेच्या काळात ते जरा लेखनापासून बाजूला गेले असले तरी बी.ए. भाग २ ला असताना नवलेखक अनुदान योजनेतून ''आंबी'' कादंबरी व ''कलाल चौक'' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. यातील कथा प्रामुख्याने ग्रामीण होत्या. त्यानंतर १९८८ ला ''पानिपत'' प्रकाशित झाली यानंतर ''पांगिरा'' (१९९०), ''क्रांतीसूर्य'' (१९९०), ''झाडाझडती'' (१९९१), ''महानायक'' (१९९६) व ''रणांगण'' (१९९९) ला प्रकाशित झाले. वरील कादंबऱ्या व ''रणांगण'' नाटक लोकांच्या गळी उतरल्याने विश्वास पाटील मराठी साहित्याचे मानदंड व आघाडीचे लेखक म्हणून ओळखले जाऊ लागले.

विश्वास पाटील यांनी कथा–कादंबरी प्रमाणेच काही नाटके लिहली आहेत. ''रणांगण'' सोडले तर इतर तीन नाटके अप्रकाशित आहेत. कथाकार म्हणून लेखनाची यशस्वी धुरा संभाळून कादंबरीचा प्रांत यशस्वी तोलून नाट्यक्षेत्रात आता ते भरारी मारत आहेत.

वाचनाची आवड असूनही त्यांना वाचनास वेळ मिळत नाही. ग्रामीण व विनोदी कथा त्यांना आवडतात. ''फकिरा'', ''आई आहे शेतात'', ''पड रे पाण्या पड'', ''पाणकळा'', ''कोसला'' या कादंबऱ्या विशेष आवडतात. ''बनगरवाडी'' या पुस्तकाची तर त्यांनी पारायणे केली आहेत. याचबरोबर सानेगुरुजी, र.वा.दिघे, वसंत कानेटकर, अरुण साधू, आनंद यादव, ह.ना.आपटे, आचार्य अत्रे, व्यंकटेश माडगूळकर, भालचंद्र नेमाडे, द.मा.मिरासदार व शंकर पाटील हे लेखक त्यांना आवडतात.

## ■ विश्वास पाटील यांचे कादंबरी विश्व :–

श्री. विश्वास पाटील हे प्रथम नवकथाकार म्हणून प्रकाशात आले तरी त्यांची खरी ओळख कादंबरीकार म्हणूनच पटते. पाटील यांच्या लेखनाची अनेक वैशिष्टे त्यांच्या एकूण साहित्यातून आपणांस पाहवयास मिळतात. पाटील यांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे कादंबरी लेखनासाठी त्यांनी निवडलेले विषय हे अगदी वैशिष्टयपूर्ण, भिन्न प्रकारचे आहेत.

''पानिपत'' या ऐतिहासिक कादंबरीला प्रचंड लोकप्रियता लाभली. या कादंबरीच्या यशस्वितेनंतर पाटील ऐतिहासिक कादंबऱ्यात रमतील असा अनेक समीक्षकांनी अंदाज व्यक्त केला. मात्र समीक्षकांच्या अंदाजाला पूर्णपणे छेद देऊन विश्वास पाटील ऐतिहासिक विषयात न गुंतता त्यांनी सामान्य माणसाचे दुःख, दारिद्रय ''झाडाझडती''च्या रुपाने वेशीवर टांगले. ''झाडाझडती''ची मूळं ''पांगिरा''त असली तरी ''पांगिरा'' कादंबरीचा विषय पूर्णतः भिन्न आहे. या दोन कादंबऱ्यावरील चर्चा पुढे येईलच.

''क्रांतीसूर्य'' ही क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी कादंबरी काय? किंवा मराठ्यांच्या एकूणच प्रवृत्तीचा तटस्थपणे विचार करायला लावणारी ''पानिपत'' काय? अथवा सुभाषचंद्र बोस याचा जीवनपट उलगडून दाखविणारी ''महानायक'' काय? या कादंबऱ्यातून त्यांनी राष्ट्रधर्म पालन करणाऱ्या व्यक्तिमत्वाचा (नायकांचा) गतकाळातील घेतलेला शोध आहे. पाटील यांच्या कादंबऱ्यात स्त्री पात्रांचे चित्रण फारसे नसते. पण आगामी कादंबरीत ते स्त्रीपात्रांच्या चित्रणावर भर देऊन प्रणयकथाही

रंगविणार आहेत. नायिका प्रधान कादंबरी लिहीण्याची त्यांची इच्छा असून त्याखेरीज संभाजीच्या जीवनावर ते कादंबरी लिहीताहेत मात्र ही गोष्ट त्यांनी जाहीर केलेली नाही. नाटक हा वाङ्मयप्रकार अतिशय अवघड असल्याने त्याकडे ते वळणार नसल्याचे सांगतात. आपण त्यांच्या प्रमुख कादंबऱ्यांची पुढील टप्प्यात ओळख करुन घेणार आहोत.

## ■ ''पानिपत''ची निर्मिती व प्रेरणा –

''पानिपत''ची ही विश्वास पाटील यांची प्रथम प्रकाशित झालेली व सर्वाधिक लोकप्रिय ठरलेली ऐतिहासिक कादंबरी आहे. याच कादंबरीमुळे पाटील यांना 'पानिपतकार' म्हणून ओळखले जाऊ लागले व त्यांचे साहित्यातील श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. १९७९ साली बी.ए. भाग ३ च्या वर्गात असताना रियासतकार सरदेसाई यांचा ''द न्यू हिस्ट्री'' हा इंग्रजी ग्रंथ पाटील यांच्या वाचनात आला. त्यातील तिसऱ्या खंडात पानिपतवर लिहलेलं पन्नास ते साठ पानांचं प्रकरण आहे. हे प्रकरण वाचताना त्यांच्या असं लक्षात आलं की, मराठी माणसाचे सर्वोच्च सद्‌गुण आणि दुर्दैवी दुर्गुण यांचा सुंदर मिलाफ पानिपत प्रकरणात आहे. त्यामुळे या विषयावर अधिक अभ्यास करुन लिहावे असे त्यांना वाटू लागले. विषयाने मनात घर केले होते, मात्र पुढे कधीतरी पाच–पंचवीस वर्षानंतर या विषयावर लिहायचे असे त्यांनी ठरविले. पुढे १९८५–८६ पर्यंत त्यांच्या असं लक्षात आले की, मराठी माणसाची संस्कृती, राजकारणात, समाजकारणात व अन्य ठिकाणी गळचेपी होत आहे. यांची जाणीव होऊन या विषयावर लवकर लिहलं पाहिजे, अधिक सखोल अभ्यास केला पाहिजे म्हणून त्यांनी टाचणे काढण्यास सुरुवात केली. पानिपत प्रकरणाचा अभ्यास करताना त्यांना असं लक्षात आलं की, यातील अनेक व्यक्तिरेखा इतिहासाला माहित आहेत मात्र त्या साहित्याला माहित नाहीत. अशा व्यक्तिरेखावर अधिक कष्ट घेऊन त्यांनी कादंबरीत त्या समर्थपणे उभ्या केल्या. ज्या नजीबखान रोहिल्यामुळे पानिपतचा महाभयंकर संहार झाला त्या

नजीबखानाची व्यक्तिरेखा आजवरच्या साहित्यातून उपेक्षित राहिली होती. ती व्यक्तिरेखा पाटील यांनी अथक परिश्रमाने व मोठ्या ताकदीने साकार केली.

जुने संदर्भ पडताळून पाहताना हा प्रसंगच मराठी माणसांच्या स्वभावाच्या बाबतीत खूप बोलका असल्याची विश्वास पाटील यांना जाणीव झाली. महाकाव्यासारखा विषय असल्यामुळे त्याचा आशय, पट, व्यक्तिरेखा एकूण सर्वच विस्तारपूर्वक सांगायचे म्हणजे कथेचा फॉर्म अपुरा होता. म्हणून त्यांनी कादंबरी हा फॉर्म निवडला. नोव्हेंबर १९८८ मध्ये ''पानिपत'' प्रकाशित झाली. ''पानिपत''ला वास्तव परिमाण लाभावे म्हणून ते प्रत्यक्ष पानिपतच्या भूमीत वावरले. ज्या–ज्या ठिकाणी भाऊसाहेबांनी मुक्काम केले त्या–त्या ठिकाणांना त्यांनी भेटी दिल्या. उत्तरेतील भौगोलिक क्षेत्राचा व हवामानाचा अभ्यास त्यांनी केला. अभ्यासाची पार्श्वभूमी म्हणून जेवढे पुरावे गोळा करता येतील तेवढे त्यांनी केले. अस्सल पत्रे, दप्तरखाने, पानिपतच्या परिसरात चालत आलेली गीते, कहाण्या, आख्यायिका, पोवाडे इत्यादी लोकसाहित्याचा आधार घेतला व जास्तीतजास्त सत्याच्या जवळ जाऊन त्यांनी ''पानिपत'' लिहीली. त्यामुळेच ''पानिपत'' ही सत्यसंशोधनाची वाटचाल वाटते. आशय मोठा असल्याने त्यांनी कादंबरीच्या रुपाने मांडला.

'' 'पानिपत' ही मराठी माणसाची भळभळणारी जखम आहे. पानिपतने अवघ्या मराठी सारस्वताला भुरळ घातली आहे, आवाहन केले आहे.'[२] शेजवळकरांचा ग्रंथ वाचून वि.वा.शिरवाडकर यांनी पानिपतवर लिहण्याचा संकल्प जाहीर केला टाचणं ही काढली पण कादंबरी लिहून झाली नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनाही या विषयावर लिहायचे होते. मात्र त्यांनाही या विषयाने हुलकावणी दिली. अनेकांनी पानिपत विषयाला हात घातला परंतु अपेक्षित परिणाम त्यांना साधता आला नाही. १९५६ मध्येच वि.स.खांडेकर यांनी पानिपत विषयावर वीस–तीस वर्षात एखादा तरुण लेखक लिहू शकेल असे भविष्य वर्तविले होते. हा योग पाटील यांच्या नशिबात होता.

''पानिपत'' प्रकाशित झाली आणि अनेक समीक्षकांना तिने आपल्याकडे वेधून घेतले. अनेक सामीक्षकांनी पानिपतचे भरभरुन कौतुक केले तर मोजक्याच समीक्षकांनी कादंबरीवरती टीकेची झोड उठविली. कादंबरीला अनेक पुरस्कार मिळाले. मुंबई आकाशवाणीने केलेल्या लोकप्रिय कादंबरीच्या सर्वेक्षणानुसार १९४७ ते १९९७ या अर्ध शतकातील पहिल्या १० श्रेष्ठ कादंबरीमध्ये मानाचे स्थान पटकावणारी कादंबरी ठरविली. हे कादंबरीचे सर्वात महत्त्वाचे यश आहे. कलकत्त्याच्या भाषा परिषदेचा उत्कृष्ट वाङ्मयाचा पुरस्कार, मुंबई प्रियदर्शनी साहित्य पुरस्कार आदी सोळा पुरस्कार या कादंबरीला प्राप्त झाले आहेत. या सर्वापेक्षा वि.वा शिरवाडकर यांनी विश्वास पाटील यांना लिहलेलं पत्र महत्त्वाचे आहे. ते लिहतात– ''प्रथमतः एक उत्तम आणि भव्य कलाकृती मराठी वाचकांना दिल्याबद्दल मी आपल्याला मनःपूर्वक धन्यवाद देतो... विषयाचा पसारा खूप मोठा. तो क्रमबद्ध करुन व्यवस्थित मांडणे म्हणजे तुफानाला गवसणी घालण्यासारखे आहे... विशेष कौतुक आपल्या भाषा शैलीचं वाटतं... आपण जो अन्वय गृहीत धरला आहे, त्या पायावर एक संस्मरणीय कलाकृती आपण निर्माण केली आहे. यात शंकाच नाही. 'कलम' आपल्यावर प्रसन्न आहे, खूप लिहा...!''[3] आजपर्यंत ''पानिपत''च्या मराठी १५ आवृत्या प्रकाशित झाल्या. हिंदी चार आवृत्या निघाल्या तर सद्या पंजाब सरकारतर्फे पंजाबी भाषेत आवृत्ती निघत आहे. अशा श्रेष्ठ व लोकप्रिय कादंबरीविषयी पुढील प्रकरणांत सविस्तर चर्चा करणार आहोत.

### ■ पांगिरा : गांव पांढरीची बदललेली कर्मकहाणी :–

विश्वास पाटील यांची ''पानिपत'' ही कांदबरी प्रथम प्रकाशित झाली असली तरी ''पांगिरा'' चे लेखन त्यांनी ''पानिपत'' कादंबरीपूर्वी केलेले आहे. सामाजिक आशय असणाऱ्या या कादंबरीत झपाट्याने बदलणाऱ्या एक खेडयाचे चित्र रेखाटले आहे. या कादंबरी विषयी पाटील म्हणतात– '' गेल्या वीस पंचवीस वर्षात झपाट्याने बदलत गेलेल्या खेड्याची ही प्रातिनिधीक कहाणी आहे.''[४] ही कहाणी त्यांना माडगूळकरांच्या माणदेशात सापडली. ''बनगरवाडी''मुळे स्मरणांत राहिलेल्या माणदेशात योगायोगाने

फलटणला पाटील यांची उपजिल्हाधिकारी म्हणून बदली झाली आणि निम्मा माणदेश त्यांच्या कार्यकक्षेत आला. पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा भेडसावणारा प्रश्न, निसर्गावर अत्याचार केल्यामुळे समृद्धीकडून उध्वस्ततेकडे स्वतःहून प्रवास करणारी अनेक छोटीछोटी खेडी, दिल्लीचं राजकारण गल्लीत आलं आणि गावागावात गट–तट निर्माण झाले. त्यांच्यातील संघर्ष ते उघड्या डोळ्यांनी पाहत होते. माण तालुक्यातील एका गावातले एक लिंबाचे म्हातारे झाड. पण त्याच्या मालकीवरुन गावामध्ये दंगल माजायची वेळ आली, शेवटी ते झाड महाराष्ट्राच्या विधानसभेत अर्ध्या तासाच्या चर्चेने गाजले. त्यावेळी दोन्ही बाजूचे इर्षेबाज गावकरी त्यांना विधानसभेबाहेर भेटले परंतु एवढ्या दिवसाचे झगडे, पोलिसातल्या तक्रारी, खटले त्यांच्या त्रासापेक्षा 'आमचा लिंबारा किती भाग्यवंत, बेण्याने अर्धातास असेंब्ली गाजवली का न्हाय?' ही आनंदी ईर्षा पाटील यांना गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होती. याच दरम्यान लोणंदला कांद्याच्या व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांचा बाजारात आणलेला माल खरेदी न करण्याचे ठरविले होते. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने उपजिल्हाधिकारी या नात्याने पोलिस गाडीतून ते बाजारात पाहणी करीत होते. तेंव्हा एका बाजूने आभाळात उठलेले काळेशार ढग, दुसरीकडे व्यापाऱ्यांचे बंद पडलेले तराजू आणि पुढ्यामध्ये नाशवंत कांदा अशा परिस्थितीत भयभीत झालेल्या गरीब शेतकऱ्यांची केविलवाणी तोंडे विश्वास पाटील यांच्या मनामध्ये कितीतरी दिवस रुतून बसली. पुढे हिच तोंडे व हेच सारे वास्तव ''पांगिरा'' मधून प्रकट झाले.

पांगिरा व डोंगरवाडी या दोन खेड्याची ही कहाणी असली तरी ग्रामीण भागातील थोड्याफार फरकाने प्रत्येक गावाची हिच अवस्था आहे. संपूर्ण दोन गावांना नायकत्व देऊन ही कादंबरी पाटील यांनी लिहीली आहे. माणसाचे सामुदायिक आयुष्य आणि त्यातील सुखदुःखांचे चढउतार हिच या कादंबरीतील प्रमुख पात्रे आहेत.

ज्ञानू, सावळा, मुरार पाटील, सोकाजीराव यांच्यातील जीवघेण्या सत्तासंघर्षाबरोबरच ग्रामीण जनतेचा तमाशाचा अस्सल रसिकपणा व रंगेलपणा वास्तववादी चित्रित केला आहे. राजकीय पाठबळ

नसणाऱ्या माणसाची कशी पिळवणूक होते याचे प्रातिनिधीक चित्र मुरार–राधाई यांच्या रुपाने हृदयस्पर्शी केले आहे. कादंबरीतील बहुतेक पात्रं त्यांनी त्यांच्या गावातील घेतली आहेत. 'राधाई' ही व्यक्तिरेखा तर त्यांनी त्यांच्या आईवरुन घेतली आहे. थोडक्यात, गावागावातील सत्तासंघर्ष, पैशाच्या हव्यासापोटी पर्यावरणाकडे होणारी डोळेझाक, सामान्य कष्टकऱ्यांची होणारी परवड, यांचे चित्रण ''पांगिरा''त अधिक भेसूर व भयाण असल्याचे दिसते. म्हणून पाटील यांना ''एका गावाच्या पांढरीची आणि काळीचीही कर्मकथा दिवसेंदिवस अधिकच भयावह रुप धारण करु लागली आहे.''[५] यांची खंत वाटते.

विश्वास पाटील लहानपणापासून खेड्यात राहिल्याने खेड्यातील बदलणाऱ्या घटनांचा वेध वेध त्यांच्या संवेदनशील मनाने घेतला आहे. तमाशा बघण्याचे व अनुभवण्याचे त्यांचे रसिकत्व लहानपणापासूनचे आहे. आठवीत असताना चुलत्यांच्या बरोबर तमाशाला जाण्याचा योग त्यांच्या नशिबात आला. मात्र तमाशा पाहताना शिटी वाजविता आली नाही म्हणून चुलत्यांची बोलणी खावी लागली. पुढे त्यांनी शिटी वाजविण्याचा सराव केला आणि आपली पाटीलकी सार्थ केली. इयत्ता सातवीपर्यंत त्यांना सुट्टीत गुरे चरायला घेऊन जावे लागत, मात्र त्याचा फायदा त्यांना पुढे झाला. साहित्यातील निसर्गवर्णने अगदी हुबेहूब साकार झाली.

''झाडाझडती''ची पाळंमुळं ''पांगिरा''त असल्यानेच म.द.हातकणंगलेकर म्हणतात– ''पांगिराच्या निमित्ताने प्रातिनिधिक, गतिमान ग्रामीण समुहाच्या दर्शनाचा मोठा लक्षणीय प्रयत्न श्री.विश्वास पाटील यांनी केला आहे. मोठ्या श्रेयाचे हे पहिले, पण दमदार पाऊल वाटते.''[६] ''पांगिर''ला राज्यशासनाचा उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाल्याने पाटील यांना ही कादंबरी म्हणजे ''देशातील कोणत्याही भागातील गांव पांढरीची कर्मकहाणी आहे.''[७] असे वाटते.

## ■ ''झाडाझडती'' : साहित्यातील उपेक्षित विषयाला न्याय :–

''झाडाझडती'' या कादंबरीचे बीज विश्वास पाटील यांच्या प्रशासकीय सेवेत आहे. शासकीय अधिकारी म्हणून काम करताना त्यांना धरणग्रस्तांचे अनिकेत अवस्थेतील दुःख, शेकडो वर्षाचे आपल्या पांढरीशी–भूमीशी असलेले बंध तुटल्यामुळे त्यांच्या हृदयात येणारी कळ जाणवून, सरंजामीवृत्ती अंगात भिनलेले उच्चभ्रू, धनदांडगे राजकारणी, कुटील व निष्ठूर समाजकंटक यांच्याकडून गोरगरीबांचं होणारं शोषण पाहून पाटील व्यथित झाले. धरणग्रस्तांच्या मूक वेदना समजावून घेण्यासाठी त्यांनी पाच जिल्ह्यातील वीस धरणांचा अभ्यास केला. असंख्य धरणग्रस्तांशी त्यांनी बातचीत केली. एकट्या पुणे जिल्ह्यातच त्यावेळी चौदा धरणे व बावीस हजार धरणग्रस्त होते. त्यांचे लोंढेच्या लोंढे पाटील यांना भेटायला यायचे. जितक्या व्यक्ती तितके प्रश्न आणि तेवढ्याच अडचणी. छोट्या–छोट्या कामासाठी त्याना करावा लागणारा आटापिटा, चेहऱ्यावरील चिंतातूर भाव हाच पाटील यांच्या चिंतनाचा विषय झाला. धरणग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी 'त्या' गावांना त्यांनी भेटी देऊन विस्थापितांशी व लाभक्षेत्रातील मंडळींशी चर्चा करावी लागे. चर्चा करताना धरणग्रस्तांच्या असंख्य प्रश्नावर पाटील यांना निरुत्तर व्हावे लागे. अनेक कुटुंबांच्या मनं पिळवटून टाकणाऱ्या दुःखाने पाटील यांच्या मनात घर केले. त्यातूनच एका अजोड, अनोख्या आणि मराठी साहित्यात आजवर न आलेल्या विषयाचा प्रचंड बाज घेऊन ''झाडाझडती'' ही विस्तीर्ण आशयपट असलेली कादंबरी आकारास आली.

शासनाकडून प्रयत्न होऊन धरणग्रस्तांच्या सर्वच समस्या अजून सुटलेल्या नाहीत ते कमालीचे हताश असहाय्य आणि निराश आहेत. अत्यंतिक दुःखाने त्यांची जगण्याची उमेदच संपून गेली आहे. अशा धरणग्रस्तांच्या दुःखांचं पाटील यांना 'डॉक्युमेंटेशन' करायचं नव्हतं. त्यांच्या व्यथा वेदनेला कादंबरीच्या रुपाने आकार द्यायचा होता. आणि दुसरं म्हणजे ग्रामीण भागातील वास्तवाचा अनुभव त्यांच्या पाठीशी होताच. त्यातूनच कादंबरीचे बीज फुलत होते.

धरणग्रस्तांचे प्रश्न हे अगदी सनातन प्रश्न आहेत. खूप प्रयत्न करुनही ते सुटतील याची खात्री देता येत नाही. आपले प्रश्न कधीतरी संपतील, दुःख नाहीसे होईल अशी भोळी भाबडी आशा बाळगणारे धरणग्रस्त वंचितच राहणार आहेत असा ''झाडाझडती'' कादंबरीचा सूचक शेवट त्यांनी केला आहे.

धरणग्रस्तांच्या असंख्य प्रश्नांचा वेध घेणाऱ्या ''झाडाझडती''ला १९९२ सालचा उत्कृष्ट कादंबरी ठरवून साहित्य अकादमीचा १ लाख रुपयांचा पुरस्कार मिळाला. मात्र ज्या अपेक्षेने समाजाने, शासनाने व अधिकारी वर्गाने या विषयाकडे पहावयास हवे होते तसे त्यांनी पाहिलेले दिसत नाही. धरणग्रस्त लोकांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यांचे प्रश्न आजही अनुत्तरीत आहेत. हेच खरे भारतीय लोकशाहीचे दुर्दैव म्हणावे लागेल.

## ▪ ''महानायक'' : राष्ट्रधर्माचे पालन करणाऱ्या उपेक्षित व्यक्तिमत्वाचा शोध :–

''महानायक'' ही विश्वास पाटील यांची सर्वात मोठा आशयपट असलेली ऐतिहासिक चरित्रात्मक कादंबरी आहे. पाचहजार मैलापेक्षा जास्त अंतर पार करुन सुभाषबाबू जपानमध्ये गेले तिथे त्यांनी ''आझाद हिंद फौज'' नावाची युद्धकैद्यांची सेना बांधली. या तीस पस्तीस हजार सैन्याने एकत्र येऊन देशाच्या स्वातंत्र्यासाठी मृत्यूला जवळ केले. जगाच्या इतिहासात असले कुठेही उदाहरण नाही. अशा सुभाषबाबूंच्या वेगळ्या व्यक्तिमत्वाचा वेध घेतला पाहिजे. या जाणिवेतून ''महानायक'' ची कल्पना पुढे आली. 'नेताजी' या तीन अक्षरांनीच विश्वास पाटील यांच्या हृदयात इयत्ता पाचवीत असतानाच प्रवेश केला. वयाच्या दहा–बाराव्या वर्षापासून नेताजींच्या प्रेमात पडलेल्या पाटील यांनी जेंव्हा–जेंव्हा नेताजींचे वृद्ध सहकारी भेटले तेंव्हा त्यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केल्या. नेताजींच्या सहवासातील किमान ७८ लोकांच्या त्यांनी ध्वनिमुद्रित मुलाखती घेतल्या. २५ हस्तलिखिते, २७ जपानी पुस्तके, २३ बंगाली पुस्तके, ३० जर्मन पुस्तके, १५ मराठी, ८ हिंदी व २११ इंग्रजी पुस्तकांचा त्यांनी सखोल अभ्यास केला आणि अजोड कलाकृती ''महानायक'' च्या रुपानं साकार केली.

आझाद हिंद फौजेची कर्तबगारी जर्मनी व पूर्व आशिया खंडातील राष्ट्रात घडली आहे. त्यामुळे जपानी, ब्रह्मी, फ्रेंच, जर्मनी, बंगाली अशा अनेक भाषांत नेताजींच्या पाऊलखुणा त्यांना शोधाव्या लागल्या. नेताजींच्या आयुष्याचा पूर्ण वेध घेऊन कादंबरीला वास्तव परिमाण लाभावे यासाठी विश्वास पाटील यांना जपान, जर्मनी, इटाली, इंग्लंड, फ्रान्स, थायलंड असा प्रवास करावा लागला. नेताजींच्या विरोधात लढलेल्या अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांच्या समवेत ब्रह्मदेशात जाऊन त्यांनी नेताजींच्या कळसास पोचलेल्या कार्यकर्तृत्वाचा शोध घेतला. जपानसारख्या देशाने नेताजींना एवढी मोठी मदत का केली? याच प्रश्नाच्या शोधासाठी पाटील यांना अनेक वेळा जपानचा प्रवास करावा लागला. ज्या आझाद हिंदच्या सैंन्यानी भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी पोटाशी पेट्रोलच्या बाटल्या व हातबॉंब बांधून शत्रूच्या रणगाडयाखाली झेप घेतली आणि ब्रह्मदेशाच्या रानात हिंदमातेचे नांव उज्ज्वल केले. मात्र या युद्धातून जे काही वाचले त्यांना अजून स्वातंत्र्यसैनिकांचा दर्जा नाही की कसलीही सवलत नाही. आणि हिच खरी ''आझाद हिंद फौजे''ची शोकांतिका आहे. याच शोकांतिकेचा शब्दरुप पूर्वार्ध म्हणजे ''महानायक'' होय.

इंफाळ आणि टोकियो मधील युद्धाचे वर्णन करताना ''महानायक''चा विषय मध्येच सोडून द्यावा असे त्यांना वाटले. १५ दिवस लिखाणाचे कामही त्यांनी बंद ठेवले. मात्र अधिक माहिती मिळविणे व ''महानायक'' पूर्ण करणे हाच एकमेव उपाय वाटल्याने पुन्हा त्यांनी लिहण्यास सुरुवात केली.

आपल्या सैनिकांची भावभावना जाणून काळजी वाहणारे नेताजी देशाच्या स्वातंत्र्यासाठी सामान्य मनुष्याला सर्व त्यागास सिद्ध करीत होते. जपान, अमेरिका, जर्मन मधील संशोधक व विद्यार्थी आजही आझाद हिंद फौजेवर संशोधन करीत आहेत. मात्र मायभूमीतून ब्रह्मदेशात जाऊन सुभाषबाबूंची माहिती मिळविणारे पाटील हे एकमेव भारतीय आहेत. म्हणूनच की काय आझाद हिंद फौजेच्या विरोधात लढलेले ब्रह्मी अधिकारी तेकेओंके ब्रह्मदेशाचा अभ्यास दौरा आटपून पाटील मायदेशात परतत असताना त्यांच्या हातात मूठभर माती देऊन भरल्या कंठाने म्हणाले ''तुम्ही जेंव्हा भारतात जाल तेंव्हा सांगा तुमच्या भारतवासियांना, म्हणावे युद्धाचे पारडे फिरले तेंव्हा आम्ही जपान्यांच्या पाठीत सुरा खुपसायला मागेपुढे

पाहिले नाही. मात्र आमच्यापैकी कोणीही आझाद हिंद फौजेतील एकाही सैनिकाच्या केसाला धक्का लावला नाही कारण, नेताजी सुभाषचंद्र जसे तुमचे आहेत तसेच आमचेही कोणी होते.''[८] सुभाषबाबूंचे कार्यकर्तृत्व दुसऱ्या देशाला समजले मात्र भारतीयांना ते उशिरा उमगले. ही सुभाषबाबूंची शोकांतिका आहे. आणि हिच शोकांतिका ''महानायक''च्या निमित्ताने त्यांनी वाचकांसमोर आणली आहे.

कादंबरीतील एक हजार पानांपैकी ६०० ते ७०० पाने भारतीय वाचकांना नवीन असली तरी मराठी सहा आवृत्या, हिंदी ३ आवृत्या तर गुजराती, तामिळ, इंग्रजी, राजस्थानी भाषेतून ''महानायक'' संपूर्ण भारतीयांसमोर येत आहे.

विश्वास पाटील यांच्या ''पानिपत'', ''पांगिरा'' व ''झाडाझडती'' या कादंबऱ्या वाचल्यावर असे लक्षात येते की, या कादंबऱ्या समूहप्रधान आहेत. नायक, नायिका किंवा खलनायक ही चाकोरीतील पात्रं नाहीत. एक संपूर्ण समूहच कादंबरीचं नायिकत्व करतो. त्यांच्या कादंबऱ्यात घटनेला अधिक महत्व असते. मग ती घटना ''पांगिरा''तील राजकारण असो, ''पानिपत''मधील युद्ध असो अथवा ''झाडाझडती''तील धरणग्रस्तांचे, विस्थापितांचे प्रश्न असोत किंवा ''महानायक''मधील वर्तमानकाळातील परंपरेला छेद देणारं भूतकाळातील सत्य असो या घटनेमुळे त्यांच्या कादंबऱ्या वास्तवतेच्या आधारावर उतरतात. स्थळकाळ, व्यक्ती, प्रसंग यांचा कुठेही विपर्यास जाणवत नाही. त्यांच्या कलात्मक चित्रणातून ग्रामीण जीवनातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकारण भेदाचे वास्तव दर्शन घडते.

### ▪ रणांगण : ''पानिपत'' ची रक्तलांच्छित नाट्यरुप शोकांतिका :—

विश्वास पाटील यांच्या ''पानिपत'' कादंबरीचं त्यांनीच केलेलं नाट्य रुपांतर ''रणांगण'' या नावानं रंगभूमीवर आलं. नाटकाचे २८० पर्यंत प्रयोग झाले आणि तांत्रिक अडचणीमुळे नाटक बंद झाले.

सध्या नव्या काही कलाकारांना प्रशिक्षण देऊन नाटक पुन्हा रंगभूमीवर आणण्याचे काम नाटकाचे निर्माते मोहन वाघ करीत आहेत.

खुद्द विश्वास पाटील यांना ''पानिपत'' कादंबरीवर नाटक होईल असं वाटलं नव्हते. नाटकाचे सर्व श्रेय ते मोहन वाघ यांना देतात. १९९२ साली ''पानिपत''वर नाटक लिहायला मोहन वाघ यांनी पाटलांना सांगितले. तेंव्हा पाटील यांनी कादंबरीतील दीर्घ प्रवासवर्णने, युद्ध यावर नाटक कसं होईल म्हणून हसण्यावारी नेलं. दरम्यान विजयाबाई मेहता यांना कादंबरीवरुन नाटक लिहण्यास मोहन वाघ यांनी सांगितलं. सुरुवातीपासून विजयाबाईंनी कादंबरी वाचली त्यांना ती फार चांगली वाटली पण त्यात त्यांना कुठे नाटक दिसेना! नंतर चार–पाच वर्षाचा काळ गेला. मोहन वाघ यांच्या डोक्यात मात्र या विषयावरील नाटकाने घर केलेलं. १९९६–१९९७ साली मोहन वाघ अमेरिकेला गेलेले असताना तिथे त्यांनी ''ला मिझरेबल'' हे फ्रेंच राज्यक्रांतीवरचं नाटक पाहिलं. तिथूनच त्यांनी पाटील यांना फोन केला आणि सांगितलं– ''मी आत्ताच ''ला मिझरेबल'' नाटक पाहून बाहेर पडलोय. १२०० ते १४०० पाने असलेल्या कादंबरीवर दोन अडीच तासाचं नाटक होऊ शकतं तर ''पानिपत'' वर का होऊ शकत नाही? नाटक लिहायला सुरुवात करा.''[१] वाघ यांच्या सांगण्यानं या विषयाची ताकद पाटील यांच्या लक्षात आली. दरम्यान फोनवरील चर्चा नाटकाचे दिग्दर्शक वामन केंद्रे यांना पाटील यांनी सांगितली व ''पानिपत'' वाचायला दिली. केंद्रे यांनी कादंबरी वाचली त्यांना कादंबरीच्या पानापानावर नाटक दिसू लागले. मग विश्वास पाटील प्रवेश लिहू लागले व केंद्रे यांच्याशी चर्चा करु लागले यातून नाटक उलगडत गेले.

''पानिपत'' विषयात काहीतरी आव्हानात्मक आहे. वामन केंद्रे यांना ''पानिपत''कादंबरी ही फक्त कादंबरीच न वाटता मराठी माणसाच्या वृत्तीचं आणि प्रवृत्तीचं नंगं दर्शन वाटलं. म्हणजे ज्या उद्देशाने विश्वास पाटील यांनी ''पानिपत'' लिहीली तीच प्रेरणा वामन केंद्रे यांच्यात दिसल्याने चर्चा करुन नाटक लिहायला सुरुवात केली.

कमी जागेत, मर्यादित वेळेत, एवढ्या मोठ्या विषयावर लिहायचे म्हणजे काही प्रवेश पाटील यांना पुन्हा पुन्हा लिहावे लागले. दिल्ली दरबारातील प्रवेश त्यांनी सतरा वेळा लिहला. मात्र हाच सीन नाटकाची पताका ठरला. भाऊसाहेब विश्वासरावांना खडसावतात हा प्रसंग तर नाटक लिहून झाल्यानंतर लिहला असल्याचे पाटील सांगतात.

विश्वास पाटील यांना पानिपत हा विषय इतका जवळचा वाटतो की ''रणांगण'' नाटकांच्या तालमीवेळी त्यांनी चार महिने रजा काढली व सेटवर उपस्थित राहिले. मुंबई बंदच्या वेळीतर पाटील यांनी थिएटरच्या पायरीवर झोपून रात्र काढली आहे. यावरुन पाटील यांच्या अंगात पूर्णपणे ''रणांगण'' भिनलंय याचा प्रत्यय येतो.

ज्यावेळी पानिपतवर नाटक होणार आहे अशी घोषणा झाली तरी कुणासही खरे वाटत नव्हते! कारण एवढी मोठी कादंबरी नाटकात कशी काय बसू शकेल? असा सर्वांनाच प्रश्न पडला होता. मोहन वाघ तर पाटील यांच्या सारखे मागे लागलेले. 'नाटक त्वरीत लिहून द्या.' पाटील यांना तर संपूर्ण कादंबरीत नाटक दिसत होतं. परंतु ते उभं करणं कठीण जात होतं. प्रचंड आकाराच्या कादंबरीतून प्रसंगांची निवड व्यक्तिरेखा, विचारसंघर्ष, विरुद्ध पक्षाकडील प्रवेश. यावरच चर्चा करण्यात पाटील व केंद्रे यांचे आठ ते दहा महिने गेले. नाटकाचा हवा तसा फॉर्म त्यांना सापडतच नव्हता. एकापुढे एक प्रवेश लिहले. रंगमंचाच्या दृष्टिकोनातून सारं मांडायचं म्हणजे त्यासाठी महत्त्वाचे प्रसंग कसे बसवायचे त्यासाठी फॉर्मची गरज भासत होती. मग गारद्यांनीच इतिहास सांगायचा ही कल्पना पाटील यांना सुचली. या कल्पनेविषयी ते म्हणतात – ''गारद्यांची कल्पना वास्तवापासून दूर जाऊन फॉर्मसाठी निर्माण करावी लागली. यात मला नाटक दिसू लागलं. नाटक बांधणे अवघड होतच परंतु पानिपतच्या पराभवाची वेगळी बाजू दाखवणं मला महत्त्वाचं होतं.''[१०] यातून असे लक्षात येते की, पानिपतच्या पराभवाचा शोध घेणे हिच नाटकाची मध्यवर्ती कल्पना आहे. म्हणूनच नाटकातील प्रत्येक व्यक्तिरेखा सामाजिक दृष्ट्या विचार करायला लावते.

''रणांगण'' लिहून पूर्ण करण्यास दोन–तीन वर्षाचा कालावधी लागला. प्रत्येक प्रवेश लिहल्यावर नाटककार, दिग्दर्शक, निर्माते, संगीतकार यांच्याशी चर्चा करुन प्रवेशात हवा तसा बदल घडवून आणावा लागला. नाट्यनिर्मितीचे हे पडद्यामागील टप्पे, पाटील यांचे परिश्रम, नाटक उभे करण्यात त्यांनी घेतलेली रिस्क... आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे पानिपतच्या पराभवाकडे पराभव म्हणून न बघता सदाशिवभाऊंच्या पराक्रमाची, कर्तृत्वाची त्यांच्या सैनिकांची यशोगाथा इतिहासाचं एक सोनेरी पान म्हणून उभी करणं ही अनेक पातळ्यांवरची कसरत पाटील यांनी केलेली आहे.

''रणांगण'' नाटकाचा शुभारंभ पानिपतच्या भूमीवर झाला. नाटकाने अमेरिकेचा दौराही केला. नाटकाला २००० सालचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कारही मिळाला. मात्र मराठ्यांच्या स्वभावात फारसा बदल नाही. ''पानिपत''ची समीकरणं आजही समाजाला लागू पडत आहेत हिच ''पानिपत''ची दुर्दैवी कहाणी आहे.

''रणांगण'' नाटकावर पुढील प्रकरणांत सविस्तर चर्चा आपण करणार आहोतच. ''रणांगण'' कन्नड भाषेतून व उर्दूमधून रंगभूमीवर येत आहे. यावरुन विश्वास पाटील यांच्यात नाटककाराकडे जे गुण असायला हवेत ते आहेत याची साक्ष पटते

## ▪ निष्कर्ष

१. विश्वास पाटील यांनी प्रथम कथाकार म्हणून लेखनास सुरुवात केली असली तरी, त्यांची खरी ओळख कादंबरीकार म्हणूनच पटते.

२. विश्वास पाटील यांनी लेखनासाठी निवडलेले विषय वैशिष्टपूर्ण व भिन्न प्रकारचे आहेत.

३. पाटील यांच्या कादंबऱ्यातून स्त्री पात्रांचे चित्रण प्रसंगापुरतेच येते मात्र भविष्यात नायिकाप्रधान कादंबरी लिहीण्याचा त्यांचा विचार आहे.

४. ऐतिहासिक कादंबऱ्या अधिक वास्तवाभिमुख होण्यासाठी त्यांनी प्रचंड परिश्रम घेतल्याचे जाणवते.

५. पाटील यांच्या बहुतेक कादंबऱ्यांना नायक, नायिका किंवा खलनायक नाहीत, चाकोरीबद्ध कादंबऱ्यातील प्रयणदृष्ये नाहीत तरीही त्यांच्या कादंबऱ्या वाचकांना भुरळ घालतात.

६. ''झाडाझडती'' व ''पांगिरा'' लिहून पाटील यांनी समाजातील ज्वलंत व धगधगत्या प्रश्नांकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे.

७. त्यांचे प्राथमिक शिक्षण ग्रामीण भागात झाल्याने त्यांच्या साहित्यातून ग्रामीण बदलाचे चित्र स्पष्ट दिसून येते. या शिवाय निसर्ग वर्णने व ऋतुवर्णने अगदी हुबेहुब वाटतात.

८. पाटील यांच्या साहित्याची भाषा प्रतिकात्मक, उपमा व रुपक, म्हणी, वाक्प्रचार यांनी युक्त असून भाषा साधी सरळ व आकलनास सोपी आहे. त्यांच्या कादंबऱ्या शोकात्मक अनुभव देतात परंतु वर्तमानकालीन विचार करायलाही प्रवृत्त करतात.

९. लेखकाची निरीक्षणशक्ती मोठी आहे त्यामुळे कादंबरीतील वर्णने चित्रदर्शी वाटतात. कादंबरीतील व्यक्तिरेखा जिवंत व वास्तवदर्शी करण्यात विश्वास पाटील यशस्वी झाले आहेत.

१०. ''रणांगण'' हे पाटील यांचे पहिलेच प्रसिद्ध व रुपांतरीत नाटक होय.

**▪ तळटीपा :–**

| | |
|---|---|
| १. | १०–१०–२००१ रोजी विश्वास पाटील यांची प्रत्यक्ष घेतलेली मुलाखत |
| २. विश्वास पाटील | 'पद्मगंधा'<br>दिवाळी अंक – १९९९<br>पृ. १३५ |
| ३. वि.वा शिरवाडकर | 'ललित'<br>जुलै – १९९०<br>पृ. १ |
| ४. विश्वास पाटील | 'पांगिरा'<br>राजहंस प्रकाशन, पुणे–१९९९<br>पृ. ४ |
| ५. त.त्रै.व. | पृ.११ |
| ६. म.द. हातकणंगलेकर | प्रस्तावनेवरुन उद्‌धृत<br>'पांगिरा' (लेखक–विश्वास पाटील)<br>राजहंस प्रकाशन, पुणे – १९९९<br>पृ.७ |
| ७. विश्वास पाटील | 'पांगिरा'<br>राजहंस प्रकाशन, पुणे – १९९९<br>पृ. १३ |
| ८. विश्वास पाटील | 'चित्रलेखा' |

| | |
|---|---|
| | दिवाळी अंक – १९९९ |
| | पृ.५१ |
| ९. त.त्रै.व. | पृ. ४९ |
| १०. मोनिका गजेंद्रगडकर | 'लोकप्रभा' |
| | ९ एप्रिल १९९९ |
| | पृ. ३७ |